अभ्यास गटाची बैठक आगामी भाग होता.



# अंजुमन इस्लाम महाविद्यालयाचे सुयश

**मुरुड : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मुरुड येथील अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजमध्ये नुकताच ऊर्जाबचत व पर्यावरण जतन या विषयावर आधारित निबंध लेखन, पोस्टर, घोषवाक्ये, वक्तृत्व व पथनाट्य स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात जिल्ह्यातील २६ महाविद्यालयामधील सुमारे ५१ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद फुलारी व मुंबई विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या स्पर्धांमध्ये अंजुमन इस्लाम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

अंजुमन इस्लाम महाविद्यालयातील सफा दरोगे हिने निबंध स्पर्धेत, विनायक पाटील याने पोस्टर स्पर्धेत आणि क्षमता कुंडे हिने वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. पथनाट्य स्पर्धेमध्ये पूजा मेहेतर हिने प्रथम, तर हुझेफा घलटे, चिन्मय पेटकर, जयेश दिवेकर व विनायक पाटील यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. निदा गोरमे हिला घोषवाक्य स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. त्यांना प्रा. बी. एस. बिडवे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद फुलारी व व्यवस्थापन समितीतर्फे या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

